ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 5 | JANUARY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सम्राट अशोक:बुद्धाच्या धम्मातून राष्ट्राची उभारणी करणारा महान सम्राट



**डॉ.जगदीश द.हेंडवे**
**सहयोगी प्राध्यापक,**
**बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय , पारवा.**
**ता.घाटंजी जि.यवतमाळ.**

सम्राट अशोक हे भारतीय इतिहासातील एक महान व्यक्तिमत्व होते ज्यांनी बौद्ध धर्माला जागतिक धर्म बनवून मौर्य साम्राज्याला सर्वोच्च स्थानी पोहोचविले. सम्राट अशोका जगाच्या इतिहासातील अद्वितीय सम्राट म्हणून ओळखला जातो .त्यांनी सत्य, अहिंसा, करुणा, शांती, दया आणि प्रेम या नीतिमूल्यांवर भर दिला. आजही त्यांची मूल्य लोकांना प्रेरणा देतात. सम्राट अशोक हा मौर्य साम्राज्यातील सर्वात शक्तिशाली राजा होते. सम्राट अशोकाने मौर्य साम्राज्याचा एवढा विस्तार केला की ,जवळपास संपूर्ण भारतीय उपखंड एकाचा साम्राज्याखाली आणला.भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासावर अमित छाप उमटविणाऱ्या सम्राट अशोकाचा कार्यकाल ४० वर्षाचा होता.तामिळनाडू आणि केरळ ही दक्षिणेतील दोन राज्य सोडली तर वर्तमानातील संपूर्ण भारत,पाकिस्तान आणि अफगाणिस्तानचा पूर्वेकडील भाग सम्राट अशोकाच्या अधिपत्याखाली होता. इतकच नव्हे तर बौद्ध धर्माला वैश्विक धर्माच्या पातळीवर पोहचविण्यात सम्राट अशोकला यश मिळालं.प्रत्यक्षात तत्कालीन काळात बौद्ध धर्माचे अनुयायी अत्यंत कमी होते.

'सम्राट अशोक यांना खऱ्या अर्थाने भारताचे संस्थापक अथवा पितामह म्हटल जाऊ शकते.' असे उदगार चार्ल्स ॲलन यांनी काढले . यावरून अशोकाच्या महानतेची कल्पना येते.

## मौर्य घराण्यातील तिसरा सम्राट-

सम्राट अशोका जन्म इ.स. पूर्व ३०४ मध्ये मौर्य घराण्यात झाला. सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांनी स्वपराक्रमाने मगध येथे मौर्य घराण्याची सत्ता स्थापन केली. सम्राट अशोकाचा जन्म बिंदुसार व सुभद्रांगी यांच्या पोटी झाला. बिंदुसारच्या सर्व राजपुत्रात अशोकात चंद्रगुप्त मौर्याप्रमाणे साहस ,धैर्य , महत्वाकांक्षा, बुद्धीचातुर्य इत्यादी चक्रवती सम्राटाचे सर्व गुण होते. राजा बिंदूसारने अशोकाच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वडील बिंदूसारने उज्जैन येथे उपराज म्हणून अशोकाची नियुक्ती केली. अशोकाने आपल्या मुसदी व लोकहितवादी सुशासनामुळे त्यांनी उज्जैनच्या प्रजेची मने जिंकली. लोककल्याणकारी राजपुत्रांशी विदिशा येथील बौद्ध श्रेष्ठीने आपली राजकन्या शाक्यकुमारी महादेवी हिच्याशी विवाह लावून दिला. सम्राट अशोकाला महादेवी पासून महेंद्र व संघमित्रा अशी दोन अपत्य झाली.

बिंदुसारच्या वारसामध्ये अशोकाचा क्रमांक सर्वात मागे होता .प्रारंभी संभाव्य वारसदाराच्या यादीतून बिंदुसाराने अशोकाच नाव काढून टाकल होते.अशोकाचा मोठा बंधू सुसिम तक्षिसाला येथे राज्यपाल असताना

त्याने तेथे अत्याचारपूर्ण कारभार केला. तेव्हा तक्षशिला येथील प्रजेने सुसिम विरुद्ध उठाव केला. सुसिम व तक्षशिला येथील जनतेत तीव्र संघर्ष भेटला. तेव्हा राजपुत्र अशोकाला बिंदुसारने दक्षिणेत पाठविले. यावेळी राजपुत्र अशोकाने शस्त्राचा वापर न करता तक्षशिलातील जनतेची सुसंवादाने मने जिंकली आणि प्रशासनात शिस्त आणली. या प्रसंगाने अशोकामधील योग्यता सिद्ध झाली. कारण सुसिम मध्ये राजकारणाचे कोणतेच गुण नव्हते . तो जनतेवर आणि प्रशासनातील अधिकारी व मंत्रांचाही अपमान करीत असे. त्यामुळे त्याच्या दूरवर्तनाने प्रशासन वैतागले होते.तेव्हा सम्राट बिंदुसार हयात असतानाच त्याने आपल्या राज्याचा उत्तराधिकारी म्हणून अशोकाची नियुक्ती केली. सम्राट बिंदुसारच्या मृत्यूनंतर अशोकाला सत्ता न मिळत सुसिम सत्तेवर विराजमान झाला. मंत्र्यांनी अशोकाला सम्राट घोषित केले असले तरी त्याला आपला भाऊ सुसिमशी चार वर्ष संघर्ष करावा लागला. वास्तिक पाहता हा गृहकलह होता. राज्यात चार वर्षांत शांतता प्रस्थापित झाल्यानंतर अशोकाला आपला राज्यभिषेक करणे योग्य वाटले. 'देवानामपिय प्रियदर्शी राजा' असा उल्लेख कलिंग शिलालेखांमध्ये आला आहे .

## रक्तरंजित कलिंगचे युद्ध-

असे समजले जाते की ब्रिटीशांच्या पूर्वी भारताच्या सर्वात मोठ्या भूप्रदेशावर राज्य करणारा राजा म्हणजे सम्राट अशोक होते.सम्राट अशोकाने साम्राज्यविस्तारला प्रारंभ केला. सम्राट चंद्रगुप्त मौर्याचा वारसा अशोकाला लाभला होता. साम्राज्य विस्ताराच्या महत्त्वाकांक्षेने अशोकाने दुय्यम काश्मीर जिंकून तेथे श्रीनगर शहर वसविले .राज्यभिषेकाच्या आठ वर्षांनंतर सम्राट अशोकाने कलिंग प्रदेश जिंकण्यासाठी मोहीम हाती घेतली. कलिंगचे राज्य स्वतंत्र होते. या राज्याचा राजा खारवेल हा स्वतंत्र वृत्तीचा व शांतवादी शासक होता. अशा कलिंगवर अशोकाने इ.स. पूर्व २६१ मध्ये आक्रमण केले. यावेळी कलिंग वासियांनी सम्राट अशोकाच्या सैन्याचा शेवटपर्यंत प्रतिकार केला. मात्र मगधच्या अजस्त्र सैन्यासमोर पुरे नेस्तनाबूत झाले.कलिंग युद्धातील विजयानंतर सम्राट अशोकाने पुन्हा कधीच युद्धभूमीवर पाऊल ठेवले नाही. कलिंग युद्धातील रक्तपात पाहून सम्राट अशोकाला दु:ख झाले.या युद्धात प्रचंड नरसंहार झाला.या युद्धात जवळपास एक लाख लोक मारले गेले.इतकच नव्हे तर युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटामुळे जवळजवळ तितकेच लोक मृत्यूमुखी पडले.युद्धानंतर दीड लाखांपेक्षा अधिक लोकांना कैदेत टाकण्यात आले.यामध्ये बहुतांश समान्य लोकांचाच समावेश होता. सुमित गुहा म्हणतात की. 'तत्कालीन काळात कलिंगची लोकसंख्या ९ लाख ७५ हजात होती .' हृदय पिळवटून टाकणारी ही घटना होती. हा रक्तसंहार अशोकाच्या जिव्हारी लागला. तो पुरा हादरून गेला. हे पाहून सम्राट अशोकाला अश्रू अनावर झाले. ह्या दु:खाने भरलेल्या वातावरणात काशाय वस्त्र परिधान केलेले शीतप्रज्ञ असलेले बौद्ध भिक्षू जखमींना पाणी पाजत होते. औषधपचार करीत होते. करुणेने ओतप्रोत भरलेले ते बुद्धपुत्र निस्वार्थी मानवसेवा करीत होते. सम्राट अशोक बेचैन झाले .त्यांचे आत्मभान हरपले होते. माता लेकरांचा आक्रोश अशोकाच्या कानात गुंज होता. अशातच बौद्ध भिक्षूंचे अपार करुणाने भरले चेहरे समोर येत होते. सम्राट अशोकाला आपल्या महत्त्वकांक्षेचा पश्चाताप झाला. अशोकाने सार्वजनिकरित्या कलिंग युद्धाबाबत दु:ख व्यक्त केले. उलट त्या भिक्षूच्या ठाई असलेली शांती, मंगल मैत्री,करुणा ,दया त्याला बौद्ध धर्माकडे आकर्षित करू लागली. आपली पत्नी शाक्यकुमारी महादेवीच्या धम्मवचनांची यावेळी त्याला आठवण झाली . सम्राट अशोक शोकमग्न अवस्थेत असताना श्रामनेर निग्रोध दृष्टीस पडले .सम्राट अशोकाने त्यांना आदराने आमंत्रित केले व धम्मदेशनीची विनंती केली . अशा प्रकारे अनित्यवादाचा उपदेश ग्रहण करून अशोकास सद्गगती प्राप्त झाली. तो धम्म मार्गी झाला.तो बुद्धाच्या विचाराकडे वळला.

## बुद्धाचा अनुयायी बनला आणि बौद्ध धर्माला वैश्विक धर्म बनविला-

धम्मदेशना घेतेवेळी सम्राट अशोकाने प्रतिज्ञा घेतली की, मी यापुढे शस्त्राने विजय प्राप्त न करता दया, शांती, करुणा आणि मैत्रीने विजय प्राप्त करेल. सम्राट अशोकाने स्वतः शस्त्राचा त्याग केला .तो दिवस म्हणजे विजयादशमी म्हणून प्रसिद्ध आहे.हेच सिद्धार्थ गौतम बुद्धानंतरचे मोठे दुसरे धम्मचक्रप्रवर्तन होय. सम्राट अशोक बौद्ध धर्माचे अनुयायी बनले.यानंतर सम्राट अशोकाने आपल्या साम्राज्याची जडणघडण गौतम बुद्धाच्या शिकवणीनुसार असलेल्या नैतिक मूल्याच्या आधारे केली.मोगलीपुत्र तिस्स या महान बौद्ध विद्वानाचे मार्गदर्शन अशोकाला लाभले. सिद्धार्थ तथागताबद्दल अपार श्रद्धा त्यांच्या ठायी उत्पन्न झाली. या श्रद्धेपोटी अशोकाने सिद्धार्थ तथागताच्या जीवनाशी संबंधित स्थळांचे दर्शन घेण्यासाठी धम्मयात्र सुरू केली. या धम्म यात्रेचे मार्गदर्शक आचार्य उपगुप्त होते. लुंबिनी,कपिलवस्तू, बौद्धगया, सारनाथ, कुशीनगर, श्रावस्ती, वैशाली आणि नालंदा या सर्व ठिकाणी सम्राट अशोकाने भेट देऊन या पवित्र स्थळांचे दर्शन घेतले. एवढेच नव्हे तर अशोकाने आपल्या सोबत अनेक कारागीर व शिल्पकार घेतले होते. या कारागीर व शिल्पकारांनी त्या सर्व ठिकाणी स्तूप, विहार, स्तंभलेख आणि शिलालेख निर्माण करून या प्रसंगांना इतिहासात अजरामर केले. पुढे या शिलालेखाने बुद्ध व अशोक या महामानवांना, महानायकांना जिवंत माणस म्हणून ऐतिहासिक असल्याची साक्ष पटवून दिली. सम्राट अशोकाने सिद्धार्थ तथागताचे धातूचे सात स्तूपामधून अस्थी काढून एकूण ८४ हजार स्तूप निर्माण केले. कारण धम्माचे स्कंद एकूण ८४ हजार होते. महान चिनी प्रवासी ह्युएनत्संग यांनी आपल्या प्रवास वर्णनात ८० हजार स्तुपांचा उल्लेख केला आहे.

## स्तंभालेख व शिलालेखात धम्म संदेश कोरले -

सम्राट अशोकाची अशी इच्छा होती की त्यांचे विचार जगापर्यंत पोहोचावे, यासाठी त्यांनी स्तंभलेख व शिलालेख निर्माण करण्यासाठी पाऊले उचलली.सम्राट अशोकाने धम्माचा संदेश देण्यासाठी स्तंभलेख, शिलालेख, गिरिलेख,गुहालेख इत्यादी पाषाणावर कोरले असल्यामुळे ते चिरकाल टिकणारे लेखन केले. या संपूर्ण शिलालेखात धम्म आणि नीतिवर आधारित आदेश हे लोककल्याणकारी सुशासनाची सुभाषिते ठरली होती. हे सर्व शिलालेख लोकभाषेतून कोरली आहेत ती भाषा म्हणजे प्राकृत भाषा होय. त्यामुळे ही लिपी धम्म लिपी असेतुहिमाचल पसरून समस्त भारत खंडाला अखंड भारतवर्ष म्हणून अभंग ठेवत होती. 'सर्व मौर्य सम्राटामध्ये अशोकाशी संवाद शैली ही वेगळी होती.' सातव्या शिलालेखात अशोकाने म्हटलं होत की,जिथे जिथे शिळा असतील किंवा दगडी स्तंभ असतील तिथे त्यांचे शब्द कोरण्यात यावेत जनेकरून ते दीर्घकाळ टिकेल. सदाचाराचा उपदेश देणारे शिलालेख सम्राट अशोकाच्या राज्याचे वैशिष्ट्य होते.

लॉर्ड कॅनिंगहम या महान ब्रिटिश अभियंत्याने उत्खनन करून काळाच्या पडद्याआठ गेलेला इतिहास पुन्हा जिवंत केला. शिलालेखातील लिपीचे वाचन ब्रिटिश लिपीतज्ञ जेम्स प्रिन्सेप यांनी १८३४ मध्ये केले.मात्र सदर लेखांमध्ये केवळ 'देवानाम प्रिय प्रियदस्सी' असा उल्लेख आला आहे. हा महान आदर्श राजा कोण हे समाजासाठी १९१५ साल उजाडले. निजाम प्रांतातील मस्की येथील शिलालेखात 'प्रियदस्सी राजा अशोकस्स' असा स्पष्ट उल्लेख आढळला. लोकांनी स्वतःवर विजयी मिळवून नितीमार्गी ,शीलमार्गी, प्रज्ञामार्गी व्हावे त्यासाठी राजा अहोरात झटत होता.

## सहिष्णुता ,अहिंसा आणि लोककल्याणावर भर-

सम्राट अशोकाने बुद्धाच्या धम्माची शिकवण अंमलात आणली.त्यांचा धम्म आध्यात्मिक पावित्र्य आणि चालीरीतीवर आधारलेला नवहता.तर जगण्याती विचार ,व्यवहारावर धम्म आधारलेला होता.या यामध्ये सहिष्णुतेवर

भर देण्यात आला तर हिंसेला थारा नव्हता. लोकसवेसाठी अर्ध्यारात्री मला उठवावे लागले तरी सेवकाने संकोच बाळगू नये. अशी आज्ञा शिलालेखावर कोरली होती. धर्मासाठी व अन्नासाठी पशुहत्या अशोकाने ताज्य ठरविली. स्वतः अशोकाने मांसाराचे सेवन बंद केले. मानवी इतिहासात माणसासोबतच पशुसाठी औषधालय व दवाखाने काढणारा हा जगातील एकमेव पहिला राजा ठरतो.

सम्राट अशोकाने लोककल्याणला प्राधान्य दिले. त्याने जनकल्याणार्थ रुंद, लांब महामार्गाची निर्मिती केली. महामार्गाच्या दोन्ही बाजूला गर्द झाडे लावली ,तळापर्यंत पायऱ्या असलेल्या विहिरी, विश्रामगृह, अन्नछस्त्रालये इत्यादींची निर्मिती केली. लोकांनी धम्म मार्गी व्हावे. यासाठी ग्रीक पासून तर वर्तमानातील संपूर्ण आशियात धम्मप्रचारक पाठविण्याचे महान कार्य अशोकाने केले. अशोकाच्या २० वर्षांपूर्वी सिद्धार्थ गौतम बुद्ध होऊन गेले त्यामुळे मधल्या काळात बौद्ध धर्म आणि संघांमध्ये अनेक प्रवृत्तींचा अंतर्भाव झाला होता. धम्माला, संघाला राजाश्रय मिळाल्यामुळे काही पोटभरू विनयहीन लोकही भिक्षू बनू लागले होते. या मधल्या काळात बौद्ध संघात १८ पंथाची निर्मिती झाली. तेव्हा मूळ बुद्ध अनुसरून धम्म संघ यांचे पुनर्जीवन करण्यासाठी अशोकाने महास्थवीर मोगलीपुत्र तिस्स याच्या अध्यक्षतेखाली तिसरी धम्म परिषद राजधानी पाटलीपुत्र येथे बोलाविली .या धम्म परिषदेत सर्व पंथातील मतभेद दूर करून मूळ बुद्धाचे विचार प्रवर्तित करण्यासाठी त्रिपिटकाचे संगायन केले. यावेळी ६० हजार विनयहिन प्रज्ञाहित भिक्षूचे चिवर उतरवून त्यांना शुभ्र वस्त्र देण्यात आली. परिणामी संघात नवचैतन्य संचारून विनकर्मे नित्यमाने होऊ लागली. सम्राट अशोकाने 'धर्ममात्य' हे नवीन पद आपल्या मंत्रिमंडळात निर्माण केले. अशोकाला वाटत होते की , सर्वांनी मिळून मिसळून राहिले पाहिजे.एकमेकांच्या मतांचा ,विचारांचा आदर केला पाहिजे.सहजीवनाच्या भावनेनं राहण्यास शिकल पाहिजे. इतरांच्या संप्रदायाचा आदर केला पाहिजे .कारण इतरांच्या संप्रदायाचा आदर करूनच तुम्हाला स्वत:च्या संप्रदायाचा आदर करता येईल.

सम्राट अशोकाने आपल्या कारकीर्दीत ४० वर्षे युद्ध न करता केवळ सदाचार आणि नीतिबळावर राज्य केले. असा राजा जगाच्या इतिहासातील एकमेव राजा होय, आणि हेच आजही एकमेव अद्वितीय राज आहे. सम्राट अशोकाने एक आदर्श राज्य भारतात निर्माण केले होते. या पृथ्वीतलावर असे आदर्श राज्य कधीच निर्माण झाले नाही. म्हणून त्याचा आदर्श आजच्या राजाने घेणे आवश्यक आहे.त्याचा आदर्श भारताने आपल्या राष्ट्रध्वजावर चिन्हांकित केला आहे. इतकेच नव्हे तर भारतीय राजमुद्रेवर त्याच्या कार्याचा ठसा उमटवला आहे. अशोकाच्या स्वविजयाचा संदेश 'अशोकचक्र' हे शांतीकालीन सर्वोच्च शौर्य या पुरस्काराने दुदुंभला आहे. सम्राट अशोकाची मंगलमैत्री ,शांती करुणेचे तत्व आजही परदेशी पाहुण्यांना राष्ट्रपती भावनातील अशोक हॉलमध्ये भारताची वास्तविक ओळख करून देतात.

अंतकाळातील सारी पृथ्वी संघाला दान करतो मृत्युपत्र हा त्यागाचा परमोच्चबिंदू सांगणारी वास्तू म्हणजे सांचीचा २६०० वर्षांपूर्वीचा प्राचीन स्तूप होय. हा स्तूप आपल्याला सांगतो की सम्राट अशोकाची महानता कधी पुसल्या जाणार नाही. कारण त्याचे सुशासन म्हणजे धम्म होता आणि धम्म म्हणजे सत्य आहे. ते सिंहस्तभशिर्षावरील वचनाप्रमाणे सत्यमेव जयते आहे ते अजरामर चिरंजीव आहे. त्यांच्या राजवटीत समाजात निर्माण करण्यात आलेल्या नीतिमूल्यांचा प्रभाव आजही पाहायला मिळतो. भारतातील आजच्या राज्यकर्त्यांनी सम्राट अशोकाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.तरच आपल्या देशात खरी लोकशाही प्रणाली नांदून लोक कल्याणकारी राज्य निर्माण होईल यात कोणतीही शंका नाही.

## संदर्भ –

१. रोमिला थापर , अनुवाद – प्राचार्य रं.ना.गायधनी व वासंती फडके –अर्ली इंडिया –प्राचीन भारताचा इतिहास – के-सागर पब्लिकेशन ,पुणे.

२. एन.जि.कांबळे –अशोक विजयादशमी –दि सोसायटी फॉर प्रोमोटिंग बुधिष्ट नॉलेज –नागपूर.
३. कीर धनंजय – डॉ.बाबासाहेब आंबेडकर –पाप्युलर प्रकाशन मुंबई.
४. गौरव ग्रंथ –डॉ.बाबासाहेब आंबेडकर –महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ ,मुंबई .
५. रोमिला थापर – अशोक आणि मौर्यांचा ऱ्हास –महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ ,मुंबई .